# म.रा. शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी महासंघ बैठक दि.०४/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | --- | --- | --- |
| २. | उच्च माध्यमिक विभागाकडील प्रलंबित मान्यता मिळालेल्या प्रयोगशाळा कर्मचाऱ्याचे शालार्थ प्रणालीत नावे समाविष्ठ करण्यासाठी मार्गदर्शन होणेबाबत | शासनाकडून दिलेल्या मुदतीत शाळांकडून शालार्थ प्रणालीत आवश्यक माहिती भरणे गरजेचे आहे. | शाळा / वेतन पथक स्तरावर | दिलेल्या कालमर्यादेत |
| ३. | भ.नि.निधीच्या स्लिपा व नापरतावा प्रकरणे लवकरात लवकर निपटारा होणेबाबत | वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूर्ण करून मुदतीत भ.नि.नि. स्लिपांचे वितरण शाळांना करणे आवश्यक आहे. तसेच ना-परतावा प्रकरणे विहित कालमर्यादेत निर्गत करावीत. विविध शैक्षणिक संघटनांकडून हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात असल्याने शिक्षणाधिकारी यांनी वेतन पथकास आवश्यक त्या सूचना देवून कामकाज पूर्ण करावे. सध्या प्रलंबित असलेल्या सर्व भ.नि.नि. स्लिपांचे वितरण माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण होईल, याची सर्व जिल्ह्यांनी दक्षता घ्यावी. शैक्षणिक संघटनांकडून पुढील बैठकीवेळी हा प्रश्न उपस्थित होणार नाही, याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास लेखी अवगत करावे. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | माहे डिसेंबर, २०१६ अखेर |
| ४. | ऑनलाईन / ऑफलाईन वेतन घेणाऱ्या प्रयोगशाळा कर्मचाऱ्यांची यादी मिळणेबाबत. | वेतन पथक यांनी संघटनेस यादी उपलब्ध करून द्यावी. | वेतन पथक स्तरावर | --- |
| ५. | प्रयोगशाळा सहाय्यक यांचे दि.१/१/१९९६ पासून रू.४०००-६००० या वेतनश्रेणीबाबत. | संघटनेने यापूर्वी दिलेल्या निवेदनाच्या प्रतीसह नवीन निवेदन या कार्यालयास दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ६. | प्रयोगशाळा सहाय्यक या एकाकी पदाच्या दि.३१/०८/२००९ च्या आश्वासित प्रगती योजनेतील ग्रेड वेतनाच्या त्रुटीबाबत कार्यबळ गटाचे निर्णय अद्यापपर्यंत समजले नाहीत. | कार्यबळ गटातील यापुढील बैठकीत याबाबत आवश्यक निर्णय घेण्यात येईल. बैठकीवेळी संघटना प्रतिनिधीस बोलाविण्यात येईल. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | --- |
| ७. | जिल्हास्तरावरील विज्ञान प्रदर्शन कमिटीमध्ये संघटना प्रतिनिधींना संधी मिळणेबाबत. | जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन कमिटीमध्ये शिक्षणाधिकारी यांनी संघटना प्रतिनिधींना संधी द्यावी. | शिक्षणाधिकारी / स्तरावर | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | प्रयोगशाळा कर्मचाऱ्यांचे उद्‌बोधन वर्ग आयोजनाबाबत. | शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे. आवश्यकता असल्यास मार्गदर्शनासाठी या कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. संघटनेने शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ९. | प्रयोगशाळा सहाय्यक / प्रयोगशाळा परिचर यापैकी एकही पद कार्यरत नसलेल्या शाळांची माहितीबाबत. | संघटनेकडून याविषयीचे निवेदन या कार्यालयास दिल्यास तसे शिक्षणाधिकारी यांना कळवून माहिती उपलब्ध करणेबाबत सूचित करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| १०. | प्रयोगशाळा परिचर यांना प्रयोगशाळा सहाय्यक पदी पदोन्नती देणेबाबत.<br>श्री.हिंदळेकर, एस्.एम्.हाय.कणकवली | शिक्षणाधिकारी यांनी संस्थेस नियमानुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत कळवावे. तसेच संस्थेने आवश्यक कार्यवाही करून अहवाल शिक्षणाधिकारी यांना सादर करावा. | शिक्षणाधिकारी / संस्था स्तरावर | --- |
| ११. | वैयक्तिक प्रकरणे. | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार या प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न पुन्हा बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर**